INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATI

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

Multidisciplinary International E-research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018

Special Issue-71

## समाज, संस्कृती आणि पर्यावरण

**Chief Editor -**

Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**

Dr. Satish Desai
Asso. Prof. Department of Sociology
Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe College,
Miraj, Dist-Sangli [M.S.] INDIA

RESEARCH JOURNEY

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखकाचे नाव | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | ग्रामीण रोजगार कार्यक्रम व सामाजिक बदल | प्रा. अनंत आवळे | 05 |
| 2 | महाराष्ट्रातील स्त्री शाहिरांचे पोवाडे | प्रा. जयकुमार चंदनशिवे | 08 |
| 3 | सिंधू संस्कृती, समाज व पर्यावरण | सौ. श्रेया दाणी | 11 |
| 4 | वडार समाजातील शैक्षणिक परिवर्तन (विशेष संदर्भ उदगीर शहर ) | श्री गोविंद ढोबळे | 15 |
| 5 | भारतीय समाज आणि सामाजिक परिवर्तन | प्रसन्ना धोंगडी | 19 |
| 6 | आपत्ती व्यवस्थापन व नियोजन : एक अभ्यास | डॉ. किशोर ढूमणे | 24 |
| 7 | आदिवासी संस्कृतीचे बदलते स्वरूप | डॉ. मीना गायकवाड | 28 |
| 8 | संस्कृती, स्त्रिया आणि पर्यावरण | डॉ. डी. के घाडगे व प्रा. ज्योती गावंडे | 32 |
| 9 | संस्कृती आणि विज्ञान | सुषमा हाके | 36 |
| 10 | तत्त्वनिष्ठ बापूजी | सौ स्वाती हाके | 39 |
| 11 | राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि पर्यावरण | डॉ. अर्चना जाधव | 43 |
| 12 | समाज आणि सामाजिक परिवर्तन | प्रा. सुषमा जाधव | 49 |
| 13 | लोकसंख्या, पर्यावरण आणि समाज | प्रा. के. एस. काळे | 52 |
| 14 | स्वच्छता आणि सामाजिक परिवर्तन | प्रा. आर. बी. काळे | 57 |
| 15 | आदिवासी स्त्रिया आणि त्यांची संस्कृती : एक अभ्यास | दादासाहेब कांबळे व डिगांबर जाधव | 60 |
| 16 | लोकसंख्येचा विस्फोट आणि पर्यावरणाचा ह्रास | प्रा. राजाराम कांबळे | 64 |
| 17 | संस्कृती आणि विवाह संस्थेत झालेले परिवर्तन | किरण कानडे | 70 |
| 18 | वेश्या व्यवसाय करणाऱ्या महिलांचा स्व-आदरभाव, संवेदीत एकाकीपणा आणि जीवन समाधान यांचा अभ्यास | प्रा. रमेश कट्टीमणी | 74 |
| 19 | सामाजिक अप्रीवार्तानाचे आधार : एक संक्षिप्त विश्लेषण | प्रा. बी. एन. कावळे | 81 |
| 20 | सामाजिक परिवर्तन आणि स्त्री जीवन | हेमलता कोले व प्रा. संगीता पाटील | 84 |
| 21 | कवठेएकंद गावातील दसरा : संस्कृती आणि परंपरा | विनोदकुमार कुंभार | 89 |
| 22 | महाराष्ट्रातील आदिवासी स्त्रियांचे प्रश्न आणि लढे | मंजुश्री लांडगे | 91 |
| 23 | गोपाळ समुदाय : संस्कृती व परिवर्तन | अमोल महापुरे | 97 |
| 24 | शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान | डॉ. राजश्री मालेकर | 100 |
| 25 | कोल्हापूर शहरातील बाल कामगारांच्या संस्कृतीचा समाजशास्त्रीय अभ्यास | डॉ. श्रीमती एस. के. माने व प्रा. श्रीमती एम. के. कन्नाडे | 105 |
| 26 | शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे शिक्षण क्षेत्रातील योगदान | प्रा. फयाज आमीर मोकाशी | 109 |
| 27 | महाराष्ट्रातील समाज व्यवस्था आणि अनुसूचित जातीतील स्त्रियांचे प्रश्न (विशेष संदर्भ औरंगाबाद शहर) | प्रा. अश्विनी मोरे | 112 |
| 28 | भूरक्याचीवाडी येथील आंध आदिवासी जमातीचा सामाजिक मागोवा | डॉ. माधव मोरे | 117 |
| 29 | सांस्कृतिक पर्यावरण आणि समकालीन ग्रामीण कथा साहित्य | प्रा. सौ. निर्मला मोरे | 123 |
| 30 | ग्रामीण कुटुंब संस्थेतील बदलाचा अभ्यास | प्रा. संतोष निलाखे | 126 |
| 31 | भाडोत्री माता / सरोगेट मदर : एक समाजशास्त्रीय मागोवा | डॉ. माधव मोरे | 130 |
| 32 | सामाजिक परिवर्तन आणि मुस्लिम परिवर्तनवादी चळवळ : टीकात्मक परीक्षण | डॉ. सलीम पठाण व प्राचार्य डॉ. अरुण गाडे | 135 |

'RESEARCH JOURNEY' International Multidisciplinary E- Research Journal | ISSN : 2348-7143
Impact Factor - (SJIF)-6.261(2017), (CIF) -3.452(2015), (GIF) -0.676 (2013) | October. 2018
UGC Approved Journal | Special Issue 71- समाज, संस्कृती आणि पर्यावरण

# कोल्हापूर शहरातील बालकामगारांच्या संस्कृतीचा समाजशास्त्रीय अभ्यास

[१]डॉ. श्रीमती एस.के.माने व [२]प्रा. श्रीमती एम.के. कन्नाडे
[१]सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख,
लाल बहादूर शास्त्री महाविद्यालय ऑफ आर्ट्स, सायन्स अॅण्ड कॉमर्स, सातारा
[२]सहाय्यक प्राध्यापिका व समाजशास्त्र विभागप्रमुख
राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज, कोल्हापूर

**प्रस्तावना :**

**संस्कृती :**

प्रत्येक मानवी समूहात संस्कृतीचे अस्तित्व आढळून येते. 'संस्कृती' हे मानवी समाजाचे अविभाज्य लक्षण मानले जाते. मानवाने मानवासाठी तयार केलेल्या सर्व वस्तू, वास्तू, कला, साहित्य, ज्ञान, विज्ञान, श्रध्दा, मुल्ये या सर्वांचे एकत्रीकरण म्हणजे संस्कृती होय. थोडक्यात मानवी जीवन जगण्याची पध्दती म्हणजे संस्कृती होय.

**बालकामगारांचा अर्थ :**

बालपण ही प्रत्येक व्यक्तीच्या जीवनातील अनमोल देणगी आहे. कारण या काळात कोणालाही कसलीही चिंता राहात नाही ना कोणती काळजी पण असे बालपण सर्वाच्याच वाटयाला येत नसते. त्याला समाजातील काही बालके अपवाद आहेत.

मुलाने केलेले कोणतेही काम ज्यातून त्या मुलाला, त्यांच्या कुटूंबातील इतर सदस्यांना किंवा कोणत्याही घटकांला कोणताही आर्थिक लाभ होत असेल, किंवा बालकामगार कायद्यानुसार १४ वर्षाच्या आतील बालक किंवा बालिका कामामध्ये व्यस्त असतील, तर ते काम करणा—या मुलास बालकामगार असे म्हणतात.

इनसायक्लोपिडिया ऑफ सोशल सायन्सेस मध्ये असे स्पष्ट केले की, अकाली प्रौढाचे आयुष्य जगावे लागणारी दर दिवशी अवाजवी काळापर्यंत कमी वेतनावर काम करणारी, आरोग्यास तसेच शारीरिक व मानसिक हानिकारक अशा वातावरणात काम करणारी, कदाचित कामासाठी कुटुंबापासून दूर राहावे लागणारी, उपयुक्त अशा शिक्षण प्रशिक्षणापासून वंचित अशा सर्वाचा समावेश बालकामगारामध्ये करण्यात येतो.

**शोधनिबंधाची उद्दिष्टे :**

१) कोल्हापूर शहरातील विविध क्षेत्रात काम करणा—या बालकामगारांचा शोध घेणे.

२) बालकामगारांच्या संस्कृतीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती :**

सदर शोधनिबंधामध्ये प्राथमिक आणि दुय्यम साधनांच्या माध्यमाद्वारे तथ्य संकलन करण्यात आले असून मुलाखत व अनुसुचीच्या माध्यमातून कोल्हापूर शहरातील १८५ बालकामगारांचा अभ्यास करण्यात आला आहे.

ज्या वयात खेळायचे – बागडायचे, शिकायचे त्या वयात कुटुंबाची जबाबदारी खाद्यावर घेऊन ती पूर्ण करणारे बालक सगळीकडे पाहावयास मिळतात. त्यास कोल्हापूर देखील अपवाद नाही. कोल्हापूर जिल्हयात ३२ हजाराहून अधिक बालकामगार आजही कार्यरत असल्याची नोंद सामाजिक संस्थाकडून करण्यात आली आहे.